दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ५१८ वा • गुरुवार, ता. १२ फेब्रुवारी २०२६ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

WRITINGS ON THE WALL...




भारत बंद आंदोलनाचे मुंबईतील आवाहन- कॉम्रेड प्रकाश रेड्डी

# एप्स्टीन फाइल : राहुल गांधींचा हल्लाबोल

## प्रधानमंत्र्यांवर दबाव असल्याचा गंभीर आरोप | सभागृहात सत्ताधारी-विरोधकांमध्ये खडाजंगी

**नवी दिल्ली । रयत समाचार**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना केंद्र सरकार आणि नरेंद्र मोदी यांच्यावर अत्यंत गंभीर आरोपांची सरबत्ती केली. अमेरिकेतील गाजलेल्या एपस्टीन फाइल्स, उद्योगपती अनिल अंबानी आणि अदानी प्रकरणाचा उल्लेख करत त्यांनी सरकारला धारेवर धरले. अनिल अंबानी यांचे नाव एपस्टीन फाइल्समध्ये असूनही ते अद्याप तुरुंगात का नाहीत? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. राहुल गांधी यांनी आपल्या भाषणात केंद्रीय मंत्री हरदीप पुरी यांचे नाव घेत सरकारला घेरले. अनिल अंबानी यांची ओळख जेफ्री एपस्टीनशी कोणी करून दिली, हे मला आणि हरदीप पुरी यांनाही ठाऊक आहे, असा दावा त्यांनी केला. या आरोपांनंतर सभागृहात मोठा गदारोळ झाला. लोकसभा अध्यक्षांनी राहुल गांधींना कोणाचेही नाव न घेण्याची ताकीद दिली, मात्र गांधींनी आपले भाषण आक्रमकपणे सुरूच ठेवले. अदानी समूहावर अमेरिकेत सुरू असलेल्या खटल्याचा संदर्भ देत राहुल गांधी म्हणाले की, हा खटला प्रत्यक्षित पंतप्रधान मोदींविरुद्ध आहे. यामुळे भाजपची आर्थिक रचना उद्ध्वस्त होईल. पंतप्रधानांवर थेट दबाव असल्याचा दावा करत ते म्हणाले की, कोणताही पंतप्रधान सामान्य परिस्थितीत डेटा, शेतकरी आणि ऊर्जा सुरक्षेबाबत अशी तडजोड करणार नाही; केवळ दबाव असेल तरच असे घडते. या आरोप-प्रत्यारोपामुळे संसदेचे कामकाज आज चांगलेच तापले होते.

### निराधार आरोपांची सवय

**मी एपस्टीनला केवळ एका आंतरराष्ट्रीय शिष्टमंडळाचा भाग म्हणून ३-४ वेळा भेटलो होतो. राहुल गांधींनी चुकीचे आरोप करण्यापूर्वी माहिती तपासून घ्यावी.**

**हरदीप पुरी**, केंद्रीय मंत्री, भाजप

**राहुल गांधी नेहमीप्रमाणे खोटे आरोप करून सभागृहातून पळ काढतात. त्यांनी केलेले आरोप सिद्ध करावेत, अन्यथा त्यांचे विधान कामकाजातून काढून टाकण्यासाठी आम्ही हक्कभंग नोटीस देऊ.**

**किरेन रिजिजू**, केंद्रीय मंत्री, भाजप



### तरीही ते जेलमध्ये का नाहीत?

### भारत-अमेरिका व्यापार करार पूर्ण शरणागती

**भारत-अमेरिका व्यापार कराराला पूर्ण शरणागती म्हटले. भाजपच्या तिजोरीला वाचवण्यासाठी मोदींनी भारतीयांचे भविष्य पणाला लावले आहे. आम्ही सत्तेत असतो तर अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्याशी समान अटींवर चर्चा केली असती.**

**राहुल गांधी**, विरोधी पक्षनेते

# पुणे ते दिल्ली लवकरच धावणार वंदे भारत

## राज्यसभेत खा. कुलकर्णी यांची मागणी

**पुणे । सलीमखान पठाण**

महाराष्ट्रातील रेल्वे प्रवाशांसाठी दिलासादायक व महत्त्वाची बातमी समोर आली असून राज्यातून थेट देशाची राजधानी दिल्लीकडे जाणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेस संदर्भात हालचाली सुरू झाल्या आहेत. पुणेदिल्ली दरम्यान वेगवान, आधुनिक व प्रीमियम रेल्वे सेवा सुरू व्हावी, यासाठी राज्यसभेत मागणी करण्यात आली आहे. सध्या पुणे ते दिल्ली या महत्त्वाच्या व व्यस्त लोहमार्गावर स्वतंत्र वातानुकूलित व उच्चगती प्रीमियम रेल्वे सेवा उपलब्ध नसल्याने खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी राज्यसभेच्या शून्यप्रहरात केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे थेट मागणी केली.

पुणेदिल्ली मार्गावर वंदे भारत स्लीपर, राजधानी एक्सप्रेस किंवा तेजससारखी आधुनिक ट्रेन तातडीने सुरू करण्यात यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. पुणे हे शिक्षण, संशोधन, आयटी, स्टार्टअप, ऑटोमोबाईल व संरक्षण क्षेत्राचे महत्त्वाचे केंद्र असून 'पूर्वेचे ऑक्सफर्ड' म्हणून ओळखले जाते. येथे नामांकित विद्यापीठे, संशोधन संस्था, संरक्षण उद्योग व केंद्र सरकारशी संबंधित अनेक कार्यालये कार्यरत आहेत. व्यवसाय, नोकरी, शिक्षण व प्रशासकीय कामकाजासाठी दररोज हजारो प्रवासी पुणेदिल्ली प्रवास करतात. मात्र सध्या उपलब्ध गाड्यांचा प्रवास २० ते ३० तासांचा असून गर्दी व मर्यादित सुविधांमुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. थेट प्रीमियम रेल्वे सेवा नसल्यामुळे अनेक प्रवाशांना मुंबईमार्गे प्रवास करावा लागतो किंवा जुन्या गाड्यांवर अवलंबून राहावे लागते. यामुळे वेळ व खर्च दोन्ही वाढत असल्याचे नमूद करण्यात आले.

पुणेदिल्ली दरम्यान वंदे भारत स्लीपर एक्सप्रेससारखी आधुनिक ट्रेन सुरू झाल्यास प्रवासाचा वेळ कमी होऊन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध होतील, तसेच अधिकारी, व्यावसायिक, गुंतवणूकदार व पर्यटकांना मोठा फायदा होईल, असे मत व्यक्त करण्यात आले. पुणे शहराला प्रीमियम रेल्वे सेवेचा दर्जा मिळावा आणि महाराष्ट्रदिल्ली थेट वेगवान रेल्वेने जोडले जावे, यासाठी केंद्र सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी करण्यात आली असून आता रेल्वे मंत्रालयाच्या निर्णयाकडे प्रवाशांचे लक्ष लागले आहे.

# आज भारत बंद

## कामगार संघटनांसोबत काँग्रेसही मैदानात

**नवी दिल्ली । रयत समाचार**

केंद्र सरकारने केलेल्या नव्या कामगार कायद्यांविरोधात देशभरातील दहा केंद्रीय कामगार संघटनांनी गुरुवार, १२ फेब्रुवारी रोजी 'भारत बंद'ची हाक दिली आहे. या बंदला विविध शेतकरी संघटनांसह काँग्रेस पक्षानेही पाठिंबा जाहीर केला असून आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कामगार कायद्यातील बदलांमुळे कामगारांचे हक्क कमी होणार, रोजगाराच्या संधी घटणार आणि खासगीकरणाला चालना मिळणार असल्याचा आरोप संघटनांनी केला आहे. केंद्रातील धोरणे कामगार व शेतकरीविरोधी असल्याचा आरोप करत काँग्रेस प्रदेशाध्यक्षांच्या सूचनेनुसार पक्षाचे पदाधिकारी




आणि कार्यकर्त्यांनी बंदमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या भारत बंदमध्ये INTUC, AITUC, HMS, CITU, AIUTUC, TUCC, SEWA, AICCTU, LPF आणि UTUC या दहा संघटनांचा सहभाग आहे. विविध औद्योगिक क्षेत्रांतील कर्मचारी आणि बँक संघटनांनीही संपात सहभागी होण्याची भूमिका घेतली आहे. दरम्यान, देशभरातील शाळा व महाविद्यालये बंद ठेवण्याबाबत कोणताही अधिकृत आदेश जारी करण्यात आलेला नाही. मात्र केरळ, कर्नाटक आणि ओडिशा या राज्यांत बंदचा प्रभाव जाणवण्याची शक्यता असून सार्वजनिक वाहतूक सेवा काही ठिकाणी ठप्प होऊ शकते. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता आहे, जरी अधिकृत सुट्टी जाहीर करण्यात आलेली नसली तरी काही शाखांमध्ये व्यवहार ठप्प राहू शकतात. सुरक्षा यंत्रणा सतर्क असून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी राज्य प्रशासनांनी आवश्यक तयारी केली आहे.

# संघटित शक्तीद्वारे समाजाची सर्वांगीण उन्नती- डॉ. तिम्मापुर

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

आधुनिक काळातील बदलत्या जगातील आव्हाने स्वीकारताना चर्मकार समाजाने जागृत राहणे आवश्यक असून संघटित शक्तीद्वारे समाजाची सर्वांगीण उन्नती होत असते, याचे भान सर्वांनी ठेवावे, असे आवाहन डॉ. एच. आय. तिम्मापुर यांनी केले. जिल्हा प्रशासन, जिल्हा पंचायत आणि महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने कारक शरण मादर चन्नय्या, मादर पोळय्या, ढोहर कक्कया व समगार हरळ्ळया जयंतीनिमित्त येथील कुमार गंधर्व रंगमंदिरात आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमास निवासी जिल्हाधिकारी विजय होनकेरी, पोलीस निरीक्षक कालिमिरची, चर्मकार समाजाचे



राज्याध्यक्ष भीमराव पवार, सामाजिक कार्यकर्ते मल्लेश चौगुले, संजय लोकापूर, संतोष होनगल आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात युनिव्हर्सल कंपनीतर्फे विवेक श्रेयकर यांनी पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना टिफिन बॉक्स बॅगचे वितरण केले. तसेच चर्मकार समाजातील गुणवंत विद्यार्थिनी श्रुती नितीन चौगुले, प्राजक्ता रुपेश चव्हाण, आरुषी लखन माने, तनिष्का गजानन माणगावकर आदींचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास विठ्ठल पोळ, करेप्पा गुडगेणावर, प्रभाकर पोळ, अश्विनी श्रेयकर, हिरालाल चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने मान्यवर व चर्मकार समाजातील बांधव उपस्थित होते.

# एसटी प्रवासाचा डिजिटल युगारंभ

## सवलतींसाठी NCMC स्मार्ट कार्ड अनिवार्य

**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या सेवेसाठी एक ऐतिहासिक पाऊल उचलले असून, आता प्रवासात नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (NCMC) प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी या नव्या डिजिटल क्रांतीची घोषणा केली. यापुढे एसटीच्या विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी हे स्मार्ट कार्ड असणे अनिवार्य असेल. हा बदल केवळ तांत्रिक नसून प्रवाशांच्या विश्वासाला डिजिटल बळ देणारा आहे, असे मत मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केले. सवलतींची अचूक नोंद आणि सुट्या पैशांच्या कटकटीतून प्रवाशांची मुक्तता करण्यासाठी महामंडळाने मे. ईबिक्स टेक्नोलॉजिस आणि पेमेंट्स बँक यांच्याशी करार केला आहे. बसस्थानकांवरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण होणार असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांना शहरात धाव घेण्याची गरज उरणार नाही. तिकीट हातात आणि सुट्या पैशांची चिंता आता इतिहासजमा होणार असून, एका क्लिकवर प्रवास अधिक सुरक्षित आणि पारदर्शक होईल, असा विश्वास जनसंपर्क अधिकारी अभिजीत भोसले यांनी पत्रकाद्वारे दिला आहे.

### कोणाकोणाला मिळणार हे कार्ड?

या योजनेत समाजातील विविध घटकांसाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे.
**विद्यार्थी :** शालेय व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्यांसाठी सरल क्रमांकाशी जोडलेले कार्ड.
**ज्येष्ठ नागरिक व महिला :** आधार संलग्न विशेष कार्ड.
**दिव्यांग :** UDID क्रमांकाशी जोडलेले कार्ड.
**पुरस्कारार्थी व पत्रकार :** स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार आणि राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना विभागीय कार्यालयामार्फत वितरण.



### कार्डची वैशिष्ट्ये आणि किंमत

प्रवाशांना हे कार्ड मिळवणे आणि रिचार्ज करणे अत्यंत सोपे ठेवण्यात आले आहे. **दर :** नवीन कार्डसाठी १९९ रुपये (GST सह). जुने स्मार्ट कार्ड जमा केल्यास सवलतीत १४९ रुपयांत उपलब्ध. **रिचार्ज :** किमान १०० रुपये आणि त्यानंतर ५० च्या पटीत रिचार्ज करता येईल. **सुविधा :** ईटीआयएम (ETIM) मशीन, महामंडळाचे संकेतस्थळ, मोबाईल ॲप किंवा अधिकृत एजंटकडे रिचार्जची सोय. **नोंदणी :** ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या मदतीसाठी ३००० हून अधिक अधिकृत एजंटची नियुक्ती करण्यात आली आहे.

# वीरगती जवानांच्या कुटुंबीयांना जमीन देण्याचा निर्णय

## शासन परिपत्रक जारी




**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

भारतीय सैन्यदल किंवा सशस्त्र दलात सेवा बजावताना युद्ध, युद्धजन्य परिस्थिती अथवा लष्करी कारवाईत वीरमरण आलेल्या जवानांच्या कुटुंबीयांना निर्बाधरित्या जमीन देण्याबाबत महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यासंदर्भात महसूल व वन विभागाकडून अधिकृत शासन परिपत्रक जारी करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाचे शासन परिपत्रक क्र. जमीन-२०२५/प्र.क्र.३२४/जमीन-०१ मंत्रालय, मुंबई येथून दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. या परिपत्रकानुसार, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ मधील नियम १२ तसेच शासन निर्णय दिनांक ०८ जुलै १९९८, १५ मे १९९९ आणि २५ जानेवारी २००० अन्वये हे धोरण निश्चित करण्यात आले आहे. तसेच शासन अधिसूचना दिनांक २८ जून २०१८ नुसार नियम ११अ मधील सुधारणा लक्षात घेऊन जमीन वाटपाच्या मर्यादेबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. अर्ज प्रक्रिया जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत परिपत्रकानुसार, संबंधित जवानाच्या विधवा पत्नी किंवा कायदेशीर वारसांनी त्यांच्या वास्तव्यास असलेल्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज करावा. त्या जिल्ह्यात शासकीय जमीन उपलब्ध असल्यास जिल्हाधिकारी स्तरावरच जमीन प्रदान केली जाईल. मात्र जमीन उपलब्ध नसल्यास प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यात येईल आणि उपलब्धतेनुसार जमीन वाटप करण्यात येईल. हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२६०२१०१६२२००६८१९ असा आहे. आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित असून उप सचिव संजय धारुरकर यांच्या स्वाक्षरीने तो जारी करण्यात आला आहे. या निर्णयामुळे वीरमरण आलेल्या जवानांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळणार असून पुनर्वसनासाठी शासनाकडून भक्कम आधार मिळेल, अशी भावना विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.



# नटसम्राट भालचंद्र उसगांवकर यांचा सन्मान

**काणकोण । रयत समाचार**

येडा खोतेगांव-काणकोण येथे पार्वती परिवारातर्फे आयोजित आदी उत्सवाच्या औचित्याने ज्येष्ठ सिनेअभिनेत्री अलका कुबल यांच्या हस्ते गोमंतकातील नटसम्राट भालचंद्र उसगांवकर यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना अलका कुबल म्हणाल्या की, नाट्यकलेच्या क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले असून गोव्यातील अनेक कलाकारांना त्यांनी व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. त्यांनी अनेक नाटकांची निर्मिती, दिग्दर्शन व अभिनय करत गोवा तसेच महाराष्ट्रात प्रयोग सादर केले आहेत. विशेषतः 'नटसम्राट' नाटकाचे यशस्वी प्रयोग सादर करून त्यांना गोमंतकातील नटसम्राट म्हणून नावलौकिक मिळाला आहे. रसिक प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी ते सदैव तत्पर असतात, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी व्यासपीठावर माजी जिल्हा पंचायत सदस्या शोभना वेळीप, पार्वती परिवाराचे संस्थापक दया उर्फ उमेश गांवकर, तोळू गांवकर, मनोज वेळीप व गजानन गांवकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कालिंदी गांवकर यांनी मानले. कार्यक्रमास काणकोण परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**'मला माहेरची साडी' या चित्रपटामुळे रसिक प्रेक्षकांचे भरभरून प्रेम मिळाले; मात्र नाटकात काम करणे म्हणजे तारेवरची कसरत असून गोव्याच्या ग्रामीण भागात अनेक नाट्यकलाकार कार्यरत असल्याची बाब अभिमानास्पद आहे. भालचंद्र उसगांवकर हे मराठी नाट्यचळवळीतील चालते-बोलते रंगमंच असून आमच्यासारख्या कलाकारांना अभिमान वाटावा असा गोव्याच्या मातीतील नाट्यवेडा हिरा आहेत.**

**अलका कुबल**, अभिनेत्री

### सोनार समाजाचे पहिले डिजिटल ॲप, वेबसाईटचे उद्घाटन

# डिजिटल व्यासपीठामुळे समाजाची एकजूट भक्कम होईल- महापौर गाडे

**अहमदनगर । रयत समाचार**

श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त सकल सोनार समाजासाठी अभिमानास्पद ठरणाऱ्या सोनार समाज समुदाय मोबाईल ॲप व वेब साईटचा प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. सकल सोनार समाजाच्या १९ उपपोटजातींना एकाच डिजिटल व्यासपीठावर जोडणारे भारतातील हे पहिलेच ॲप्लिकेशन व वेब साईट असून समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक व व्यावसायिक एकतेस बळ देणारा हा ऐतिहासिक उपक्रम असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कोहिनूर मंगल कार्यालय, पारिजात चौक, सावेडी, अहिल्यानगर येथे झालेल्या या कार्यक्रमास महापौर ज्योती अमोल गाडे अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या. यावेळी नगरसेवक निखिल वारे, सुभाष कायगांवकर, पारखे, मुंडके, रेल्वेचे डेप्युटी इंजिनियर दत्तात्रय लोळगे, कुलथे, डहाळे यांच्यासह सकल सोनार समाजातील ज्येष्ठ, वरिष्ठ पदाधिकारी, सर्व अध्यक्ष, माता-भगिनी तसेच सराफ सुवर्णकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या डिजिटल उपक्रमासाठी गणेश कुलथे व योगेश कुलथे यांनी विशेष परिश्रम घेतले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या, आजच्या डिजिटल युगात समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग आवश्यक आहे. या ॲपच्या माध्यमातून समाजातील व्यावसायिकांना योग्य ओळख मिळेल, युवक-युवतींसाठी विवाह नोंदणीसारखी विश्वासार्ह सुविधा उपलब्ध होईल तसेच सामाजिक उपक्रमांना व्यापक प्रसिद्धी मिळेल. संतांच्या विचारांवर आधारित समाजबांधणीसाठी हा उपक्रम दिशादर्शक ठरेल. अशा सकारात्मक उपक्रमांना महापालिकेच्या वतीने कायम सहकार्य राहील. या ॲप व वेब साईटमध्ये कौटुंबिक निर्देशिका, सामाजिक कार्यकर्ते निर्देशिका, व्यवसाय नोंदणी व जाहिरात, सोनार समाजाच्या बातम्या, सामाजिक कार्यक्रम जाहिरात, विवाह नोंदणी, दैनंदिन वाढदिवस, अभिप्राय तसेच श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या जीवनकार्याची माहिती अशा विविध उपयुक्त सुविधांचा समावेश करण्यात आला आहे. ॲप्लिकेशनविषयी सविस्तर माहिती चैतन्य लोणे यांनी दिली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित मान्यवरांनी आयोजकांचे अभिनंदन केले. सोनार समाजाच्या डिजिटल वाटचालीतील हा उपक्रम मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास व्यक्त करत प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न झाला.



> **सोनार समाजाने आपल्या परंपरेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत उभारलेले हे डिजिटल व्यासपीठ अत्यंत कौतुकास्पद आहे. समाजाच्या १९ उपपोटजातींना एकत्र आणणारा हा उपक्रम केवळ ॲप किंवा वेब साईट नसून समाजातील एकजूट, विश्वास आणि संघटनशक्ती मजबूत करणारा ठरेल. संत शिरोमणी नरहरी महाराजांच्या विचारांना आधुनिक माध्यमातून पुढे नेण्याचे हे प्रभावी साधन आहे.**
>
> **ज्योती अमोल गाडे**, महापौर

# अहिल्यानगरात १२ ठिकाणी पे अँड पार्क, नो पार्किंग झोन

## महापालिकेकडून हरकती व सूचनांचे आवाहन




**नो पार्किंग, नो हॉकर्स झोन**

**शहरातील प्रमुख चौकांच्या २५ मीटर परिसरात आता वाहने लावण्यास किंवा फेरीवाल्यांना बसण्यास मनाई असेल. यात आनंदधाम चौक, अहिंसा चौक, चाणक्य चौक, महात्मा फुले चौक, पाटील हॉस्पिटल चौक, एस्सार पंप (महात्मा फुले मार्ग), सुरभी हॉस्पिटल चौक, पारिजात चौक, गुलमोहर पोलीस चौकी, आयुर्वेद कॉलेज चौक, अमरधाम चौक आणि मोची गल्ली रोड या भागांचा समावेश आहे.**

**होणार पे अँड पार्क दुचाकी व चारचाकी**

**१. अहिंसा चौक ते आनंदधाम चौक २. अहिंसा चौक ते चाणक्य चौक ३. शिवरत्न जिवबा महाले चौक ते एस्सार पंप ४. पारिजात चौक ते सुरभी हॉस्पिटल ५. कुष्ठधाम चौक ते कलानगर चौक (गुलमोहर रोड) ६. कापड बाजार (मदुरा क्लोथ ते हनुमान मंदिर, सर्जेपुरा) ७. सर्जेपुरा हनुमान मंदिर ते लहुजी वस्ताद चौक ८. घास गल्ली (फक्त मध्यभागी दुचाकी) ९. गुणे आयुर्वेद कॉलेज ते स्वस्तिक चौक १०. मंगल गेट ते रामचंद्र खुंट ११. पारशा खुंट ते कोठी चौक १२. साईदीप हॉस्पिटल लगतचा रस्ता.**

**हरकती कोठे नोंदवाल?**

**प्रभाग समिती कार्यालय क्र. १, सावेडी. प्रभाग समिती क्र. २, जुने महापालिका कार्यालय, माळीवाडा. प्रभाग समिती कार्यालय क्र. ३, झेंडीगेट. प्रभाग समिती कार्यालय क्र. ४, बुरुडगाव रोड. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे भवन, छत्रपती संभाजीनगर रोड.**

**अहमदनगर । रयत समाचार**

शहरातील वाढती वाहतूक कोंडी फोडण्यासाठी आणि रस्ते शिस्तबद्ध करण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेने कंबर कसली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार, शहरातील वर्दळीच्या १२ ठिकाणी पे अँड पार्क तर १२ ठिकाणी नो पार्किंग, नो हॉकर्स झोन प्रस्तावित करण्यात आले आहेत. या प्रस्तावावर महापालिका प्रशासनाने नागरिकांकडून हरकती व सूचना मागविल्या आहेत. या प्रस्तावाबाबत नागरिकांना काही आक्षेप किंवा सूचना असल्यास त्यांनी ता. ११ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी २०२६ (दुपारी १२ वाजेपर्यंत) लेखी स्वरूपात सादर कराव्यात. शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी हा निर्णय प्रस्तावित आहे. नागरिकांनी आपल्या विधायक सूचना मुदतीत मांडून सहकार्य करावे, असे आवाहन यशवंत डांगे, आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका यांनी केले.

# बेग पटांगणातील घाणीचे साम्राज्य त्वरित साफ करा- संभाजी कदम

**अहमदनगर । रयत समाचार**



प्रभाग क्र. १२ मधील मनपाच्या ताब्यात असलेल्या बेग पटांगण परिसरात साचलेला कचरा, मनपाचे कंटेनर व भंगार साहित्य तसेच झालेली अतिक्रमणे त्वरित हटवून परिसराची स्वच्छता करण्यात यावी, अशी मागणी शिवसेना शहर प्रमुख संभाजी कदम यांनी आयुक्तांकडे केली आहे. संबंधित ठिकाणी स्वच्छता केल्यानंतर नागरिकांच्या सोयीसाठी जागेचे सुशोभीकरण करून जॉगिंग पार्क विकसित करण्यात यावे, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

बेग पटांगण ही जागा मनपाच्या ताब्यात असून पुरातत्त्व विभागाच्या अडचणीमुळे येथे बांधकाम करणे शक्य नसल्याने सुरक्षा भिंत उभारून मोकळ्या जागेत जॉगिंग पार्कसारखा उपक्रम राबविण्यात कोणतीही कायदेशीर अडचण राहणार नाही, असेही निवेदनात म्हटले आहे. तसेच या ठिकाणी वृक्षारोपण व अन्य सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर प्रभाग १२ मधील नगरसेवक बाळासाहेब बोराटे, सुरेखा कदम, दत्तात्रय कावरे, मंगला लोखंडे आदींच्या सह्या आहेत. मागणीची त्वरित दखल घेऊन कार्यवाही न झाल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही कदम यांनी दिला .



# आंबेडकरी चळवळीकडून अजित पवार यांना श्रद्धांजली

**अहमदनगर । रयत समाचार**

शहरातील आंबेडकरी चळवळीच्या वतीने महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण पवार यांच्या हस्ते झाले होते. याच ठिकाणी बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करत शोकसभेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. हा श्रद्धांजली कार्यक्रम आंबेडकरी चळवळीतील अशोक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. कार्यक्रमास नगरसेवक सुरेश बनसोडे, अमित काळे, विजय भांबळ, विलास साठे, सुमेध गायकवाड, सिद्धार्थ आढाव, विशाल कांबळे, युवराज पाखरे, मंगेश मोकळ, आदींसह आंबेडकरी समाजातील युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशोक गायकवाड म्हणाले की, उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या अचानक अपघाती निधनाने संपूर्ण राज्यावर मोठा आघात झाला आहे. घात की अपघात या प्रश्नावर पूर्णविराम देण्यासाठी प्रकरणाची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. शहरासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून शहराचा कायापालट केला. राज्यात त्यांनी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा पुरस्कार केला. त्यांच्या निधनाने आंबेडकरी चळवळीचा मजबूत पाठीराखा हरपला असून बहुजन समाजातील दुर्मिळ नेता गमावल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धार्थ आढाव यांनी केले, तर आभार सृजन भिंगारदिवे यांनी मानले.

# पिंपळगाव माळवी येथे शेतकरी चर्चासत्राचा समारोप

## ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव अंतर्गत कार्यक्रम

**नगर तालुका । रयत समाचार**



पिंपळगाव माळवी येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कृषी महाविद्यालय, विळद घाट यांच्या वतीने ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम २०२५-२६ अंतर्गत शेतकरी चर्चासत्र संपन्न झाले. या कार्यक्रमात कृषी विभागाच्या विविध योजनांबाबत कृषी सहाय्यक योगेश घोलप यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. पीक विमा योजना, अनुदानित बियाणे व खत, शेती यंत्रसामग्री अनुदान, सिंचन सुविधा, कर्ज योजना आदींबाबत माहिती देण्यात आली. शेतकऱ्यांनी अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे व लाभ घेण्याच्या मुदतींबाबत प्रश्न विचारले असून त्यांना समाधानकारक उत्तरे देण्यात आली. कांदा बीज उत्पादन विषयावर डॉ. विवेक निकम यांनी विशेष व्याख्यान देत उच्च दर्जाचे बीज उत्पादन, योग्य जातींची निवड, रोपवाटिका, लागवड, पाणी व खत व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रण तसेच बीज कापणी व प्रमाणन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. संत्रा फळबाग व वन व्यवस्थापन या विषयावर डॉ. विकास घुमरे यांनी संत्रा लागवड, छाटणी, खते, कीडनाशक व्यवस्थापन व उत्पादन वाढ यावर माहिती दिली. यावेळी माजी सरपंच राधिका प्रभुणे, मच्छिंद्र झिने, दत्तात्रय भोंदे, प्रा. देवराम शिंदे, जालिंदर कदम, मेजर विश्वनाथ गुंड, बापू बेरड, ग्रामविकास अधिकारी दत्तात्रय वाळके, प्रा. किरण दांगडे, प्रा. पूनम ठोंबरे यांच्यासह गावातील शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांनी चर्चासत्राचा मोठ्या प्रमाणात लाभ घेत विविध प्रश्न विचारून माहिती मिळवली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषी महाविद्यालयातील कृषी कन्या अश्विनी मुळे, साक्षी मुठे, मानसी निमसे, साक्षी रोडे, प्रतीक्षा राऊत, किरण सावंतफुले यांनी विशेष परिश्रम घेतले. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अद्ययावत कृषी तंत्रज्ञान व योजनांची माहिती मिळावी यासाठी अशा जागरूकता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# ठोंबे बंधूंचा वंचित बहुजन आघाडीत प्रवेश

## फुले-शाहू-आंबेडकरी विचारांची प्रेरणा



**अहमदनगर। रयत समाचार**

वंचित, शोषित आणि उपेक्षित समाजघटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सातत्याने संघर्ष करणाऱ्या वंचित बहुजन आघाडीच्या परिवर्तनवादी विचारधारेने प्रेरित होऊन बाभुळगाव येथील प्रदीप ठोंबे आणि खांडका येथील सचिन ठोंबे यांनी आपल्या असंख्य समर्थकांसह पक्षात जाहीर प्रवेश केला.

ॲड. बाळासाहेब आंबेडकरांच्या स्वाभिमानी राजकारणावर विश्वास ठेवून झालेला हा प्रवेश आगामी काळात जिल्ह्यातील राजकीय समीकरणांमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडवून आणणारा ठरेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. पक्षप्रवेशाचा कार्यक्रम वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांच्या नेतृत्वाखाली तसेच ज्येष्ठ नेते व सल्लागार जे.डी. शिरसाठ यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. परिवर्तनाची मोठी ताकद - योगेश साठे यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष योगेश साठे म्हणाले, वंचित बहुजन आघाडी हा केवळ राजकीय पक्ष नसून तो परिवर्तनाची मोठी ताकद आहे. प्रदीप आणि सचिन ठोंबे यांच्यासारख्या सामाजिक जाणीव असलेल्या कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे बाभुळगाव व खांडका परिसरात पक्ष अधिक सक्षम झाला आहे. जनतेच्या प्रश्नांवर आम्ही अधिक आक्रमक भूमिका मांडणार आहोत.'' गावोगावी संघटन मजबूत करू - ठोंबे बंधू प्रवेशानंतर आपली भूमिका स्पष्ट करताना प्रदीप व सचिन ठोंबे म्हणाले, फुले शाहू आंबेडकरी विचारधारा आणि बाळासाहेब आंबेडकरांचे खंबीर नेतृत्व हेच वंचित घटकांना न्याय देऊ शकते. या विचाराने प्रेरित होऊन आम्ही पक्षात प्रवेश केला आहे. आता गावोगावी जाऊन संघटन मजबूत करण्यासाठी कटिबद्ध आहोत. पक्षप्रवेश कार्यक्रमास जिल्हा संघटक सुधीर ठोंबे, जिल्हा उपाध्यक्ष योगेश क्षीरसागर, युवा शहराध्यक्ष योगेश गुंजाळ, जिल्हा सदस्य फैरोज पठाण, विनायक गोरखे, देविदास भालेराव, संतोष पवार, कैलास पगारे, विजय मिसाळ यांच्यासह अनेक कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रयत समाचार Classified

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० । ७७७४००१८०० । ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# २० ऑक्टोबरच्या पटसंख्येवर या वर्षीची संचमान्यता करा

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाची मागणी

**अहमदनगर । सलीमखान पठाण**

शिक्षण संचालक कार्यालयाकडून नुकतेच जिल्ह्यातील शाळांतील विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात शिक्षक संख्या निर्धारित करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले आहे; मात्र या संचमान्यतेमध्ये शिक्षण संचालक कार्यालयाकडून अनेक अक्षम्य चुका झाल्याचे निदर्शनास येत आहे. आधार प्रमाणित विद्यार्थी असतानाही कमी शिक्षक संख्या निश्चित झाल्याची प्रकरणे समोर येत आहेत.



या चुकीच्या संचमान्यतेमुळे अनेक शिक्षक अतिरिक्त ठरण्याची भीती निर्माण झाली आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष केशव जाधव यांच्या नेतृत्वाखाली शिक्षक नेते बापूसाहेब तांबे, राज्य संघाचे उपाध्यक्ष दत्ता कुलट, अहिल्यानगर प्राथमिक शिक्षक बँकेचे चेअरमन गोरक्षनाथ विटनोर यांच्यासह राज्य शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने नुकतीच शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांची भेट घेऊन याविषयी सविस्तर चर्चा केली. यावेळी संचमान्यतेमध्ये असलेल्या त्रुटी शिक्षण मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या. विद्यार्थी पटावर असून व नियमित शाळेत उपस्थित असूनही केवळ आधार नोंदणी केलेली नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना संचमान्यतेतून बाहेर फेकण्यात येत आहे. शालेय शिक्षण विभागाकडून २३ डिसेंबर २०२५ रोजीच्या पत्रानुसार २० ऑक्टोबर २०२५ रोजीच्या आधार प्रमाणित विद्यार्थी संख्येनुसार शिक्षक संख्या निश्चित करण्याचे आदेश देण्यात आले. त्यामुळे शाळेत नियमित उपस्थित असूनही केवळ आधार नोंदणी होत नसलेल्या अनेक विद्यार्थ्यांना संचमान्यतेत वगळण्यात आल्यामुळे अनेक शाळांमध्ये शिक्षकांची पदे कमी झाल्याचे शिक्षण मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले. पुरोगामी महाराष्ट्रात विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील करून घेण्याचा व शिक्षणाचा हक्क नाकारण्याचा हा प्रकार आहे. त्यामुळे २० ऑक्टोबर २०२५ रोजीच्या पटसंख्येच्या आधारावर शिक्षक संख्या निश्चित करण्यात यावी अशी मागणी शिष्टमंडळाचे वतीने शिक्षण मंत्र्यांकडे करण्यात आली. जोपर्यंत संच मान्यतेतील त्रुटी दूर होत नाहीत तोपर्यंत अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात येऊ नये अशी ही मागणी करण्यात आली. वाडीवस्तीवर, तांड्यांवर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणाची ज्योत तेवत ठेवणारी ज्ञानमंदिरे बंद करून तेथील गोरगरीब कुटुंबातील मुलांना त्यांचा शिक्षणाचा मूलभूत हक्क नाकारण्याचा हा प्रकार आहे. संचमान्यतेसह इतर सर्वच प्रश्नासंदर्भात चर्चा करण्यासाठी शिक्षण मंत्र्यांच्या उपस्थितीत शिक्षण सचिवांसह इतर वरिष्ठ अधिकारी व संघटनेची लवकरच एक बैठक आयोजित करण्याचे आश्वासन शिक्षण मंत्र्यानी दिल्याची माहिती शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांनी दिली. यावेळी विद्युलता आढाव, सर्वश्री राजेंद्र शिंदे, गोकुळ कळमकर, राजेंद्र सदगीर, बबन गाडेकर, संतोष दुसुंगे, अर्जुन शिरसाठ, रवींद्र पिंपळे, शरद सुद्रिक, विजय ठाणगे, नारायण पिसे, रविकिरण साळवे, आबासाहेब दळवी, राजेंद्र कुदनर, वृषाली कडलग, संतोष भोपे, प्रकाश नांगरे, बाबा खरात, संतोष दळे, बाळासाहेब कापसे आदि उपस्थित होते.

**चूकीची संचमान्यता हा गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या मार्गातील अडथळा आहे. अनेकविध अशैक्षणिक कामे आणि भरमसाठ उपक्रम यामुळे शिक्षक मेटाकुटीला आलेला असताना टीईटी, सीटीईटी यांसारख्या परिक्षांद्वारे आपली पात्रता सिद्ध करण्याची दुर्दैवी वेळ शिक्षकांवर आलेली आहे. जोपर्यंत संचमान्यतेतील चूका दुरुस्त होत नाहीत तोपर्यंत अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात येउ नये.**

**दत्ता कुलट,**
उपाध्यक्ष, राज्य संघ



# यश-अपयश पचविण्याची क्षमताच तुम्हाला यशस्वी करेल- गणेश पिंगळे

**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**

उत्तम नियोजन, अविरत कष्ट आणि वेळेचा सदुपयोग आपल्याला जीवनात यशस्वी बनवतील. यश आणि अपयश या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या दोन्ही गोष्टी जो विद्यार्थी पचवण्याची क्षमता निर्माण करेल, तोच खऱ्या अर्थाने आयुष्यात यशस्वी ठरेल, असे प्रतिपादन घुमनदेव जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक गणेश पिंगळे यांनी केले. येथील महाराष्ट्र सेवा मंडळाच्या प्रेमजी रतनसी पटेल हायस्कूलमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला, त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त नारायण डावखर होते. या सोहळ्यास दानशूर व्यक्तिमत्व संतोष कासलीवल, तहसील कार्यालयातील सहाय्यक महसूल अधिकारी अशोक नरोड, न्यू इंग्लिश स्कूलचे वरिष्ठ लिपिक दिनेश तरटे, पत्रकार संदीप पाळंदे आदी उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डावखर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा देत संस्थेच्या वाटचालीत विद्यार्थ्यांचे स्थान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. संतोष कासलीवल यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासासोबत सामाजिक भान जपण्याचे आवाहन केले, तर सहाय्यक महसूल अधिकारी अशोक नरोड यांनी प्रशासकीय सेवेतील संधींबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर माळी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक दिलीप शेवाळे, नानासाहेब मेहेत्रे, फारुख सय्यद, संजय कुऱ्हे, प्रमोद हरदास, सागर माळी, अतुल खर्डे, अमोल आंधळे, प्रविण शेंडगे, परशराम वेताळ, इंद्रसिंग साठे, बाळासाहेब मांजरे व समाधान लोखंडे यांनी परिश्रम घेतले. शेवटी मुख्याध्यापक दिलीप शेवाळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.




# आदर्श विद्यालयात दहावी विद्यार्थ्यांचा शुभेच्छा समारंभ

**नेवासा । विजय खंडागळे**

सोनई येथील आदर्श विद्या मंदिरमध्ये एसएससी बोर्ड परीक्षेला सामोरे जाणाऱ्या दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी शुभेच्छा समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास संस्था सचिव रविराज तुकाराम गडाख, संस्था अध्यक्षा जयश्री रविराज गडाख, व्याख्याते एन. बी. धुमाळ, सेवानिवृत्त प्राचार्य खोसे, पत्रकार विनायक दरंदले आणि डॉ. संतोष लांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर अरुण चांदघोडे अध्यक्षस्थानी होते. प्रास्ताविक वैष्णवी शिंदे यांनी केले, तर ज्ञानेश्वरी गडाख यांनी आभार प्रदर्शन केले. सूत्रसंचालन ऋचिता राऊत आणि श्रेया शिंदे यांनी केले. व्याख्याते एन. बी. धुमाळ यांनी विद्यार्थ्यांनी सकारात्मक विचार ठेवून ध्येयवादी वृत्तीने आत्मविश्वासाने कार्य केल्यास यश निश्चित मिळते, असे मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक फोपसे आणि वर्गशिक्षक अशोक दराडे यांनीही विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा देत मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सी. बी. दरंदले, एस. पी. पवार आणि प्रा. तुवर यांनी विशेष प्रयत्न केले.

# महादेव गुट्टे यांचा कृष्णप्रकाश यांच्याकडून गौरव

**पाथर्डी । नितीन गटाणी**

संगमनेर शहर व पाथर्डी पोलीस ठाणे हद्दीत बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या कत्तलखान्यांच्या साखळीवर स्थानिक गुन्हे शाखेने थेट प्रहार करत मोठी कारवाई केली. तब्बल तीन आठवड्यांच्या सलग मोहिमेत २९ जणांविरुद्ध ७ गुन्हे दाखल करण्यात आले असून सुमारे ७३ लाख ७ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या धाडसी व परिणामकारक कारवाईचे नेतृत्व करणारे पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे यांना नुकतेच अप्पर पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश यांच्या हस्ते जिल्हा पोलीस दलाकडून प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. १४ डिसेंबर २०२५ ते ५ जानेवारी २०२६ या कालावधीत एलसीबीने गुप्त माहितीच्या आधारे साखळी कारवाया राबवल्या. नियोजनबद्ध पद्धतीने सापळे रचत व ठिकठिकाणी छापे टाकत अवैध कत्तलखान्यांचे जाळे उद्ध्वस्त करण्यात आले. कारवाईदरम्यान मोठ्या प्रमाणावर जनावरे, वाहने व संबंधित साहित्य जप्त करण्यात आले. या मोहिमेमुळे संबंधित भागातील बेकायदेशीर व्यवसायाला मोठा धक्का बसला असून कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने हा टप्पा महत्त्वाचा मानला जात आहे. या धाडसी कामगिरीची वरिष्ठांनी दखल घेत जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे व अपर पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश (फोर्स वन व प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई) यांनी कारवाईचे कौतुक करत अवैध कृत्यांविरुद्ध सातत्यपूर्ण व शिस्तबद्ध कारवाई हीच पोलिसांची ओळख असल्याचे नमूद केले. एलसीबीच्या या मोहिमेमुळे जिल्ह्यात अवैध कत्तलखाने व धंद्यांविरुद्ध कठोर संदेश गेला असून कायदा मोडणाऱ्यांवर कारवाईचा धडाका पुढेही कायम राहणार असल्याचे संकेत पोलीस प्रशासनाने दिले आहेत. दरम्यान, विशेष पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल गुट्टे यांचे पोलीस दलासह सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.





# बेघरांच्या रखडलेल्या स्वप्नांना आधार

## घरकुल लाभार्थ्यांना विनाशुल्क वाळू वाटप

**नेवासा । विजय खंडागळे**

| शहरातील घरकुलांची स्थिती |
| --- |
| एकूण मंजूर घरकुले : ३६८ |
| पूर्ण झालेली बांधकामे : २७८ |
| प्रगतीपथावरील कामे : ९० |

शासनाच्या गृहनिर्माण योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळावे, यासाठी नेवासा शहरात प्रशासकीय पातळीवर एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. शासनाच्या अधिसूचनेनुसार, स्वामित्वधन न आकारता ३७ घरकुल लाभार्थ्यांना महसूल विभागाने जप्त केलेली सुमारे १८० ब्रास वाळू विनाशुल्क वितरित करण्यात आली. रखडलेल्या स्वप्नांना आधार सन २०१८-१९ मध्ये मंजूर झालेली अनेक घरकुले वाळूची टंचाई आणि आर्थिक अडचणींमुळे अर्धवट अवस्थेत होती. ही रखडलेली कामे पूर्ण व्हावीत, यासाठी आमदार विठ्ठलराव लंघे यांनी पुढाकार घेतला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या वाळू वाटपाचे नियोजन करण्यात आले. प्रशासकीय उपस्थिती या वाळू वाटप कार्यक्रमाप्रसंगी प्रांताधिकारी सुधीर पाटील, नेवासे नगरपंचायतीचे मुख्याधिकारी निखिल फराटे, नायब तहसीलदार बोरुडे, गौण खनिज लिपिक संतोष लहरे, नगरपंचायत घरकुल अभियंता राहुल आढाव यांसह महसूल व नगरपंचायत विभागाचे कर्मचारी आणि लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जप्त केलेली वाळू थेट गरजूंना मिळाल्याने लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या निर्णयामुळे नेवासा शहरातील प्रलंबित घरकुलांचे काम आता वेगाने पूर्ण होऊन गरिबांचे हक्काच्या घराचे स्वप्न साकार होणार आहे.

# नागवडे विद्यालायची श्रुतिका ठरली 'सुवर्णकन्या'

## नीतू दुलानी यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

नागपूर येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत महाराष्ट्र संघाने दिल्ली संघाचा ७-२ असा दणदणीत पराभव करत सुवर्णपदक पटकावले. या विजयी संघाचे नेतृत्व करत नागवडे इंग्लिश मिडीयम स्कूलची माजी विद्यार्थिनी श्रुतिका नितीन वाबळे हिने 'सुवर्णकन्या' ठरण्याचा मान मिळवला. श्रुतिकाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल नागवडे इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये तिचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना श्रुतिकाने शालेय जीवनात खेळाची आवड जोपासण्यासाठी मिळालेले प्रोत्साहन आणि क्रीडा शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच भक्कम पाया तयार झाला व हे यश संपादन करता आले, असे सांगितले. ''खेळासोबतच अभ्यासालाही तितकेच महत्त्व आहे,'' असेही तिने विद्यार्थ्यांना आवर्जून सांगितले. दरम्यान, शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल लोकशक्ती न्यूज नेटवर्क, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने नागवडे इंग्लिश मिडीयम स्कूलच्या



मुख्याध्यापिका नीतू दुलानी यांना 'आदर्श मुख्याध्यापक' पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात केलेल्या प्रगतीची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. या पुरस्काराबद्दल तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानच्या वतीने नीतू दुलानी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, विश्वस्त अनुराधा नागवडे, निरीक्षक एस. पी. गोलांडे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी श्रुतिका व मुख्याध्यापिका नीतू दुलानी यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# श्रीरामपूरात ७५ लाखाचे वाचनालय, स्पर्धा परीक्षा केंद्र

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजनेतून श्रीरामपूर शहरात सुमारे ७५ लाख रुपयांचे वाचनालय अभ्यासिका बरोबरच स्पर्धा परीक्षा केंद्र साकारत आहे. पुस्तक प्रेमी आणि हुशार विद्यार्थ्यांसाठी हे वाचनालय तसेच अभ्यासिका वरदान ठरणार आहे. जय हिंद युथ क्लब स्पर्धा परीक्षा केंद्र अभ्यासिका आणि वाचनालय अशा स्वरूपात वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेतून ही वास्तू उदयास येत आहे.

प्राप्त परिस्थितीत वाचनालयाचे फाउंडेशन आणि भिंतीचे काम झाले आहे. शहरातील कर्मवीर चौकातील मिनी स्टेडियम मैदान आवारात अत्यंत विस्तृत आणि निसर्गतः शांत परिसरात हे वाचनालय उभे राहत आहे. या वाचनालयात शांत अभ्यासासाठी पुरेशी जागा, विविध विषयांवरील अद्ययावत पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे आणि डिजिटल



संसाधनांचा इंटरनेट, संगणक समावेश, सोयीस्कर बसण्याची व्यवस्था, ग्रंथपाल, सूची (Catalogue) विभाग आणि पुस्तके घरपोच मिळण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

वाचनालयात ग्रंथसंपदा (Books & Resources), कथा, विज्ञान, इतिहास, संदर्भ पुस्तके, मासिके आणि वर्तमानपत्रे उपलब्ध असणार आहेत.शांत आणि प्रशस्त वाचन कक्षा बरोबरच शांत वातावरण आणि अभ्यासासाठी स्वतंत्र टेबल्स डिजिटल सुविधा, ई-बुक्स, इंटरनेट, संगणक आणि वाय-फाय (Wi-Fi) सुविधा देखील येथे उपलब्ध राहणार आहेत. पुस्तके शोधण्यासाठी संगणकीकृत सूची (Catalogue), ग्रंथपाल आणि मदत कक्ष, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, पुरेसा प्रकाश आणि पंखे/वातानुकूलित व्यवस्था यांचा यात समावेश आहे.

पुस्तकांचे प्रदर्शन, लेखक भेट, वाचक चर्चासत्रे आणि मुलांसाठी स्पर्धा आयोजित करणे सभासदत्व व क्रिया जलद नोंदणी, पुस्तक देवाण-घेवाणीसाठी बारकोड सिस्टीम आणि योग्य नियम वाचनालय हे केवळ पुस्तकांचे घर नसून ज्ञानाचे केंद्र असावे, या उद्देशाने हे वाचनालय आणि अभ्यासिका उभारली जात आहे. जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात अशा प्रकारचे वाचनालय उभे राहत आहे. श्रीरामपूर नगरपालिकेने या वाचनालयाला लवकरच मूर्त स्वरूप देण्याचे धोरण आखले आहे. चौकातून परिसरात असणाऱ्या महाविद्यालयात हजारो विद्यार्थ्यांना जावे लागते. अतिशय सुयोग्य ठिकाणी हे वाचनालय सुरू होत असल्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्याबरोबरच अनेक ज्येष्ठ नागरिक इतर विद्यार्थी आणि नागरिकांनी श्रीरामपूर पालिकेच्या या उपक्रमाचे कौतुक केले आहे.

# उत्क्रांतीवादाचा जनक चार्ल्स डार्विन

उत्क्रांती वादाचा जनक असे ज्यांना समजले जाते त्या चार्ल्स रॉबर्ट डार्विन यांचा आज जन्मदिन. डार्विन हे विख्यात जीवशास्त्रज्ञ होते. त्यांनी मांडलेल्या उत्क्रांतीवादाच्या सिद्धांतात जगातील जीवसृष्टीची उत्पत्ती व विकासाची कशी प्रगती होत गेली हे शास्त्रशुद्धरित्या उलगडून दाखवले. चार्ल्स डार्विन यांचा जन्म १२ फेब्रुवारी १८०९ रोजी इंग्लंडमधील श्रॉपशायर परगण्यात झाला. त्यांचे वडील रॉबर्ट डॉक्टर तर आजोबा इमर्सन शास्त्रज्ञ होते. शालेय जीवनात त्यांना रसायन शास्त्राची खूप आवड होती म्हणून आपल्या भावाच्या मदतीने त्यांनी आपल्या घराबाहेर एक छोटीशी प्रयोगशाळा उभारली होती तिथे ते तासनतास प्रयोग करीत बसत. ते असे एकाच जागेवर तासनतास प्रयोग करीत बसत असल्याने मित्र मंडळी त्यांची नेहमी टर उडवत पण ते त्याकडे कायम दुर्लक्ष करीत. त्यांना निसर्गाचीही खूप आवड होती. पुढे त्यांची डॉ. ग्रांट यांच्याशी ओळख झाली. ग्रांट हे स्वतः प्रसिद्ध जीवशास्त्रज्ञ होते. १८२५ मध्ये डार्विन यांनी केंब्रिज विद्यापीठाच्या क्राईस्ट महाविद्यालयात नाव नोंदवून पदवी मिळवली. तिथे त्यांना कीटक व निसर्गातील जीव जिवाणूंच्या निरीक्षणाचा नाद लागला. १८२६ मध्ये कॅप्टन किंगने दक्षिण अमेरिका संशोधनाची मोहीम आखली त्यात ते सहभागी झाले. त्या मोहिमेवर ते पाच वर्ष होते. तिथे त्यांनी निरनिराळे पक्षी, प्राणी, कीटक, जीवजंतू एकमेकांशी कसे वागतात. ते एकमेकांशी आणि निसर्गाशी कसे जुळवून घेतात याचे निरीक्षण व अभ्यास केला व तेथे उत्क्रांतीवाद, सहजीवन, बळी तो कान पिळी ही मूलभूत नैसर्गिक तत्वे ते शिकले. याच दरम्यान माणसाचा मूळ पुरुष, चार पायी माकडपासून झाला असला पाहिजे असा विचार त्यांच्या डोक्यात घुमू लागला. त्यांनी याचे खूप संशोधन केले. वेगवेगळे प्राणी कसे निर्माण झाले यासंदर्भातही त्यांनी खूप संशोधन केले. या संशोधनावर आधारित ओरिजन ऑफ स्पेसिस हा ग्रंथ त्यांनी लिहिला. या ग्रंथातच त्यांनी उत्क्रांतवादाचा सिद्धांत मांडला आहे. या ग्रंथाच्या १२५० प्रति एकाच दिवसात विकल्या गेल्या. या ग्रंथामुळे त्यांचे सर्वत्र नाव झाले. या ग्रंथात त्यांनी मांडलेला उत्क्रांतीवादाचा सिध्दांत बायबलच्या विरुद्ध जात होता म्हणून अनेकांनी या सिद्धांताला विरोध केला. हा सिद्धांत बायबलच्या विरुद्ध जातो म्हणून त्याचा निषेध करण्यासाठी १८६० मध्ये ऑक्सफर्डमध्ये विलबर फोर्स या बिशपने सभा बोलावली.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

डार्विन यांचा एकीकडे पुरोगामी विचारांचे लोक समर्थन करीत होते दुसरीकडे प्रतिगामी लोक विरोध करीत होते. पण या सर्व घडामोडींचा डार्विन यांच्यावर कोणताही परिणाम होत नव्हता त्यांचे संशोधन चालूच होते. बिशप डार्विनला कडाडून विरोध करीत असताना हक्सले डी हुकर हे शास्त्रज्ञ मात्र डार्विन यांची बाजू सडेतोड व सोदाहरण मांडत होते. त्यामुळे उत्क्रांतीवादाच्या सिद्धांताला कडाडून विरोध करणाऱ्या बिशपला अखेर माघार घेऊन डार्विनचा सिद्धांत मान्य करावाच लागला.

# दोन सुपर ओव्हरचा थरार

## दक्षिण आफ्रिकेचा अफगाणिस्तानवर संस्मरणीय विजय

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२६ मधील तेरावा सामना क्रिकेटप्रेमींसाठी अविस्मरणीय ठरला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने अफगाणिस्तानवर दोन सुपर ओव्हरनंतर थरारक आणि संस्मरणीय विजय मिळवला. अखेरच्या चेंडूपर्यंत उत्कंठा कायम राहिलेल्या या सामन्याने प्रेक्षकांना अक्षरशः खिळवून ठेवले. प्रथम फलंदाजी करत दक्षिण आफ्रिकेने २० षटकांत ६ गडी गमावून १८७ धावा उभारल्या. क्विंटन डी कॉकने ४१ चेंडूंमध्ये ५९ धावांची संयमी आणि प्रभावी खेळी साकारली. रायन रिकेल्टनने २८ चेंडूंमध्ये ६१ धावांची स्फोटक खेळी करत डावाला गती दिली. डेव्हिड मिलरने नाबाद २०, तर मार्को यान्सेनने अवघ्या ७ चेंडूंमध्ये १६ धावा जोडत संघाला भक्कम धावसंख्या मिळवून दिली. अफगाणिस्तानकडून अझमतुल्लाह ओमरझईने ३, तर राशिद खानने २ बळी घेतले. लक्ष्याचा पाठलाग करताना अफगाणिस्ताननेही तितकाच जोरदार प्रतिकार केला. रहमानुल्लाह गुरबाजने ४२ चेंडूंमध्ये ८४ धावांची वादळी खेळी करत सामना रंगतदार बनवला. अझमतुल्लाह ओमरझईने २२, तर राशिद खानने २० धावा करत संघाला विजयाच्या उंबरठ्यावर नेले. मात्र, दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांनी निर्णायक क्षणी अचूक टप्प्यावर मारा करत सामन्याचे पारडे फिरवले. अफगाणिस्तानचा डाव १९.४ षटकांत १८७ धावांवर संपला आणि सामना बरोबरीत राहिला. पहिल्या सुपर ओव्हरमध्ये अफगाणिस्तानने १ षटकात बिनबाद १७ धावा केल्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेने १ षटकात १ गडी गमावून १७ धावा करत सामना पुन्हा बरोबरीत आणला. त्यामुळे दुसऱ्या सुपर ओव्हरची वेळ आली आणि थरार आणखी वाढला. दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये अफगाणिस्तानला १ षटकात २ गडी गमावून १९ धावांपर्यंत मजल मारता आली. प्रत्युत्तरात डेव्हिड मिलर आणि ट्रिस्टन स्टब्स यांनी आक्रमक



फटकेबाजी करत अवघ्या १ षटकात बिनबाद २३ धावा करत सामना संपवला आणि दक्षिण आफ्रिकेला थरारक विजय मिळवून दिला. ३ बळी आणि निर्णायक क्षणी केलेल्या संयमी गोलंदाजीसाठी लुंगी सानी एनगिडीला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने गट 'ड' मधील आपले स्थान अधिक भक्कम केले. दोन सुपर ओव्हरपर्यंत गेलेला हा सामना टी-२० विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वोत्तम आणि संस्मरणीय लढतींपैकी एक ठरला.







# लाठीकाठी स्पर्धांतून किशोरींमध्ये आत्मविश्वास

## ठाण्यात अंतिम फेरी उत्साहात संपन्न

**ठाणे । गुरुदत्त वाकदेकर**

लाठीकाठी स्पर्धांच्या माध्यमातून सेवा सहयोगचा किशोरी विकास प्रकल्प ग्रामीण व आदिवासी भागातील मुलींमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि धैर्य निर्माण करत आहे, असे गौरवोद्गार प्रमुख पाहुणे व या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश पाटणकर यांनी काढले. पत्रकार योगिता साळवी या विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. सेवा सहयोग फाउंडेशन व महानगर गॅस लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे येथे लाठीकाठी व शिवचरित्र अभिव्यक्ती स्पर्धेची भव्य अंतिम फेरी मोठ्या उत्साहात पार पडली. या वर्षी युनेस्कोकडून १२ किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर शिवचरित्र अभिव्यक्ती स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. किशोरी विकास प्रकल्पांतर्गत मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पालघर, माणगाव, महाड, श्रीवर्धन, कर्जत व खोपोली परिसरातील ११४ किशोरी वर्गांपैकी निवडक १० वर्गांतील मुलींनी या स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. लाठीकाठी स्पर्धेत मुलींचा जोश, उत्साह आणि शिस्त पाहण्याजोगी होती. शिवाजी महाराजांवरील विविध गाण्यांच्या तालावर मुलींनी लाठीकाठीचे प्रभावी आणि आकर्षक प्रयोग सादर केले. शिवचरित्र अभिव्यक्ती स्पर्धेत महाराजांच्या जीवनातील विविध प्रेरणादायी प्रसंग उत्साहात सादर करण्यात आले. शिवजन्म, रायगड व सिंधुदुर्ग यांची जन्मकथा, गड आला पण सिंह गेला, हिरकणी यांसारखे नाट्यप्रसंग प्रेक्षकांची मने जिंकून गेले. लाठीकाठी स्पर्धेसाठी ठाण्याचे बाळा साठे व दापोलीचे सुरेंद्र शिंदे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. तर शिवचरित्र अभिव्यक्ती स्पर्धेसाठी स्मिता भोसलेधुमाळ व प्रा. भारती जोशी यांनी परीक्षकांची भूमिका निभावली. लाठीकाठी स्पर्धेत प्रथम क्रमांक पालघर विभागाने पटकावला. द्वितीय क्रमांक कर्जत, तर तृतीय क्रमांक खोपोली विभागाला मिळाला. महाड विभागाला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. शिवचरित्र अभिव्यक्ती स्पर्धेत ठाण्यातील झवेरीठाणावाला विशेष शाळेच्या मुलांनी प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय पारितोषिक श्रीवर्धन, तर तृतीय पारितोषिक महाड विभागाला मिळाले. उत्तेजनार्थ बक्षीस नवी मुंबई व कर्जत विभागांना देण्यात आले. या उपक्रमामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास, शिस्त, संघभावना आणि सांस्कृतिक जाणीव वृद्धिंगत होत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# राज्य अजिंक्यपद स्पर्धेसाठी सबज्युनिअर संघ सज्ज

## धाराशिवविरुद्ध सलामीचा सामना

**अहमदनगर । रयत समाचार**

वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनच्या वतीने आयोजित आंतर-जिल्हा राज्य अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२६ (सब-ज्युनिअर बॉईज) नांदेड येथे ता. १२ ते १७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत होणार आहे. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनअंतर्गत निवड झालेला अहिल्यानगर जिल्हा सब-ज्युनिअर मुलांचा संघ नांदेडकडे रवाना झाला आहे. या संघामध्ये जिल्ह्यातील निवडक व गुणवंत खेळाडूंचा समावेश असून संघाचे नेतृत्व कर्णधार सम्राट आव्हाड करणार आहेत. संघाचे प्रशिक्षक प्रसाद पाटोळे तर संघ व्यवस्थापक म्हणून अभिषेक सोनवणे काम पाहत आहेत. अनुभवी मार्गदर्शन व तरुण खेळाडूंचा जोश यामुळे संघाकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा



**अहिल्यानगर जिल्हा सब-ज्युनिअर संघ**

सम्राट आव्हाड (कर्णधार), शौर्य चंगेडिया, ईशान पटारे, स्वराज जाधव, प्रथम गव्हाणे, देवर्ष पत्की, हर्ष फुलसौंदर, वीरेन सोलट, रुद्र भोये, आर्यन बोर्डे, साईदीप भगत, वेदांत बांगर, अवनीश देशमुख, अलोक कनोजिया, साई खाडे, शौर्य मोरे, झायन शेख, विहान बोथरा, मोहित चौधरी, विधान देशमुख.

व्यक्त केली जात आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेत अहिल्यानगर संघाने उत्कृष्ट खेळ करत जिल्ह्याचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, जोगासिंह मिन्हास, अमरजितसिंह शाही, सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीपकुमार जाधव, व्हिक्टर जोसेफ, खजिनदार रिशपालसिंह परमार, सहखजिनदार रणबीरसिंह परमार तसेच सदस्य राजू पाटोळे यांनी दिल्या आहेत. स्पर्धेतील अहिल्यानगर जिल्हा संघाचा सलामीचा सामना धाराशिव जिल्हा संघाविरुद्ध ता. १२ फेब्रुवारी रोजी होणार असून पहिल्याच लढतीत चुरशीचा सामना रंगण्याची अपेक्षा आहे.

# नागवडे कारखान्याच्या गळीत हंगामाची सांगता

## ५ लाख ८० हजार मे.टन ऊस गाळप

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

**या हंगामात कारखान्याने ६ लाख ६ हजार क्विंटल साखर उत्पादन केले असून सरासरी १०.५० टक्के साखर उतारा मिळाला आहे. संचालक मंडळाने घेतलेल्या धाडसी निर्णयांमुळे मशिनरीत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले असून त्यामुळे कारखान्याचे दैनंदिन गाळप ६५०० ते ७००० मे. टनांपर्यंत पोहोचले आहे. भविष्यात कमी कालावधीत अधिक गाळप करण्यासाठी सभासद व ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे सहकार्य आवश्यक आहे.**

**राजेंद्र नागवडे**, चेअरमन

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याने विविध आव्हानांवर मात करत सन २०२५-२६ या गळीत हंगामात ५ लाख ८० हजार मे. टन ऊसाचे गाळप पूर्ण केले. हा हंगाम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सभासद व ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोड मुकादम, मजूर, वाहतूकदार, ठेकेदार आणि कामगार यांनी मोलाचे सहकार्य केल्याचे प्रतिपादन कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी केले. मंगळवार, ता. १० रोजी दुपारी ४.३० वाजता गळीत हंगामाचा समारोप करण्यात आला. यावेळी बोलताना नागवडे म्हणाले की, श्रीगोंदा तालुक्यात उसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून सभासद शेतकऱ्यांनी संयम ठेवून गाळपासाठी सहकार्य केल्यास भविष्यात उच्चांकी गाळपाचे उद्दिष्ट गाठणे शक्य होईल. किमान फेब्रुवारी अखेरपर्यंत कारखाना सुरू राहिला असता तर उद्दिष्ट पूर्ण झाले असते, असेही त्यांनी नमूद केले. कारखान्याचे संस्थापक स्व. शिवाजीराव बापू नागवडे यांनी सभासद शेतकऱ्यांना



योग्य न्याय देण्याची भूमिका कायम ठेवली. त्यांच्या विचारांचा वारसा जपत सभासदांना जास्तीत जास्त ऊसदर देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे नागवडे यांनी स्पष्ट केले. ऊसदराच्या बाबतीत नागवडे कारखाना कायम अग्रेसर राहिला असून शेतकरी हिताला प्राधान्य दिले आहे. यावेळी संचालक लक्ष्मण रायकर, मारुती पाचपुते व ज्ञानदेव खरात यांच्या हस्ते गव्हाणीची विधिवत पूजा करून श्रीफळ व अखेरची ऊसाची मोळी गव्हाणीत टाकण्यात आली. कार्यक्रमास व्हा. चेअरमन मेघा औटी यांचे पती संदीप औटी, संचालक भाऊसाहेब नेटके, शरद जगताप, विश्वनाथ गिरमकर, विठ्ठल जंगले, सावता हिरवे, बंडू जगताप, प्रा. सुरेश रसाळ, प्रवीण लबडे, दत्तात्रय कातोरे, कामगार युनियन अध्यक्ष रामभाऊ लबडे, मधुकर हिरवे, दीपक तारकुंडे, मुकादम धुलचंद राठोड, नामदेव राठोड, कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे तसेच सर्व खातेप्रमुख, कामगार, ऊस उत्पादक शेतकरी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालक सुभाष शिंदे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले, तर श्रीनिवास घाडगे यांनी आभार मानले.